25 APR 2014

क्र. अपोमसं/प्रशि/पोशि-भरती/जाहीरात/पोभ-२०१४/ /१०० मुंबई दि.२५/०४/२०१४

संदर्भ:- या कार्यालयाचे समक्रमांक १७७९/२०१४, दि. २३/०४/२०१४ चे परिपत्रक.

**विषय :- पोलीस शिपाई भरती २०१४ जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.**

*****

पोलीस भरती -२०१४ करीता सर्व घटक प्रमुखांनी द्यावयाचा जाहिरातीचा सुधारीत नमुना सोबत जोडला आहे. सदर पोलीस भरतीकरिता परिक्षा शुल्क रु. १५०/- ऐवजी रु. १२५/- करण्यात येत आहे. तसेच उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे.

सदर जाहिरातीच्या सुधारीत नमुन्याचे कृपया सर्व घटक प्रमुखांनी अवलोकन करावे. त्यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास या कार्यालयास तात्काळ लेखी सुचित करण्यात यावे. तसेच सदरची जाहिरात दिनांक ३०/०४/२०१४ रोजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्याची वरील परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. सदर तारखा ह्या तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन, त्या नंतर निश्चीत करण्यात येईल.

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल यांनी कृपया राज्य राखीव पोलीस बल सेवाप्रवेश नियमाप्रमाणे सदर जाहिरातीमध्ये आवश्यक तो बदल करुन घ्यावा.

**( एस. पी. गुप्ता )**
**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,**
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्गसह).
सर्व पोलीस अधिक्षक, (लोहमार्गसह).
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६.
व्यवस्थापक, महाऑनलाईन लि. मुंबई.

प्रत सविनय सादर,

अपर मुख्य सचिव, गृहविभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सस्नेह,

आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, का. व सु./ आस्थापना / प्रशासन / नि.व.स. / राज्य राखीव पोलीस बल / लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल नागपूर / पुणे.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.
व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, मुंबई मुख्य शाखा, मुंबई.

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१४

येथे घटकांचे नाव नमूद करावे.

**जाहिरात क्रमांक** **ठिकाण** **दिनांक / /२०१४**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ आणि शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार ------------------ (घटकांचे नाव) खालील नमूद पदांसाठी पोलीस भरती आयोजित करण्यात येत आहे.

१. **पोलीस शिपाई :**

| | खुला | अजा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | | | | | | | | | | |
| कप्पीकृत आरक्षण ⬇ | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | | | | | | | | | | |
| महिला | | | | | | | | | | |
| खेळाडु | | | | | | | | | | |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | | | |
| भुकंपग्रस्त | | | | | | | | | | |
| माजी सैनिक | | | | | | | | | | |
| अंश-पदवीधर | | | | | | | | | | |
| गृहरक्षक दल | | | | | | | | | | |
| इतर | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | |

**वर दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे.**

२. **बँडस्मन :** वर नमूद पदांपैकी --------------- पदे उपलब्धतेनुसार बँडस्मन पदांमधून भरली जातील.

३. **पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम -२०११ हे** https://mahapolice.mahaonline.gov.in **या संकेत स्थळावर (Home Page) उपलब्ध असुन ते सर्व उमेदवारांना लागू राहतील.**

४. जाहिरातीत नमुद अटींची पुर्तता करणारे उमेदवार यांनी खाली दिलेल्या विहीत दिनांकाच्या मुदतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरु शकतात.

   १. ऑनलाईन आवेदन अर्ज सुरू होण्याचा दिनांक व वेळ :- ०५/०५/२०१४ - १०.०० वा. पासून
   २. ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याची अंतिम दिनांक व वेळ :- २५/०५/२०१४ - २२.०० वा. पर्यंत
   ३. स्टेट बँकेत बँकेत पैसे भरण्याची शेवटचा दिनांक :- २६/०५/२०१४ (बँकेच्या वेळेनुसार)

५. पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदावरील निवडीसाठी उमेदवारांकडे खालील नमूद वय शैक्षणिक व शारिरीक पात्रता असणे आवश्यक आहे:-

i. **वय** - दिनांक ३०/०४/२०१४ रोजी वय कमीत कमी १८ वर्षे जास्तीत जास्त २५ वर्षे (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या धोरणानुसार उच्चतम वयोमर्यादत सूट देय राहिल.)

**ब. शैक्षणिक अर्हता :-** महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा.अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**क) शारीरिक पात्रता :-**

| | महिलांकरिता | पुरुषांकरिता |
|---|---|---|
| i) उंची .. | १५५ सें. मी. पेक्षा कमी नसावी | १६५ से. मी. पेक्षा कमी नसावी |
| ii) छाती.. | .. .. .. | न फुगवता ७९ से. मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से. मी. पेक्षा कमी नसावा |

**ii. पोलीस बॅन्ड -**

अ) **शैक्षणिक अर्हता:** बँड पथकासाठी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा उत्तीर्ण.

ब) **शारीरिक पात्रता:** बँड पथकाच्या भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या बाबतीत या नियमाच्या उप नियम (१) च्या खंड (क), उपखंड (i) व (ii) मध्ये विहीत केलेल्या शारीरिक पात्रतेमध्ये खालीलप्रमाणे सवलत देण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील:-

i) उंची :- २.५ से. मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी

ii) छाती :- २ से. मी. न फुगविता व १.५ से. मी. फुगवुन

क) **अनुभव व इतर अटी: i)** बॅन्ड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बॅन्ड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहील.

ii) पोलीस बँड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठीत करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बँड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

iii) पोलीस बँड पथकातील निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयातील अन्य कर्तव्यही बजावणे आवश्यक राहील.

iv) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहित मात्र हे उमेदवार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बँड पथकात बदलीस पात्र ठरतील.

नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतुदी, खेळाच्या प्रवर्गाकरिता उंचीमधील सुट, व पोलीस दलातील कर्मचायांच्या कुटूंबियांच्याबाबत अनुज्ञेय असलेली सूट https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

६. उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे.

**७.** सर्व प्रमाणपत्र अर्ज भरावयाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत (दि. २५/०५/२०१४) प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

८. अर्ज ऑनलाईन अथवा महा ई-सेवा केंद्राद्वारे (C.S.C.) भरता येईल. महा ई-सेवा केंद्र (C.S.C.) केंद्रांची यादी व आवश्यक माहिती https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर परीक्षेकरीता परीक्षा शुल्क रु. १२५/- आहे.

या पोलीस शिपाई भरतीचे सर्व नियम व अर्ज करण्याची पद्धत, इत्यादी https://mahapolice .mahaonline .gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

****